**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि. ०२ मार्च २०२३**

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १०६/२०२३ भादंविसक ३८० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २८/०२/२०२३ रोजी २१.०० वा ते दि ०१/०३/२०२३ रोजी ०४.३० वा.फिर्यादीचे राहते घरी,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/०३/२०२३ रोजी २०.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अनिल भिकाजी मोरे,वय-४९ वर्षे, रा- ६८,अंबिका नगर अ.कोट रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ४२,०००/- रू चे त्यात काळया रंगाची होन्डा शाईन मो.सायकल व एक विवो वाय २१ व विवो वाय १२ मोबाईल. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची नमुद वर्णनाची व किमतीची मोटार सायकल व फिर्यादी तसेच तिची मुलगी वापरत असलेले दोन मोबाईल फिर्यादी हे हवा येण्यासाठी दरवाजा उघडा ठेवून झोपले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे समंतीवाचून वरील वर्णनाचे व किंमतीचे मोबाईल व गाडी ही मुद्दाम लबाडीने चोरून घेवून गेले आहे.म्हणून. तपासः- पोह/१२६६/भांगे- ९९२३८८८०६१ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १२३/२०२३ भादंविसक ३२४,३२३,५०४,५०६,३३६,४२७,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २८/०२/२०२३ रोजी २२.३० वा अरविंद धाम पोलीस लाईन जवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/०३/२०२३ रोजी २२.५७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | गणेश दत्तात्रय राजगुरू,वय-२९ वर्षे,रा- हौसे वस्ती आमराई दमाणी नगर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) शुभम ऊर्फ बल्लम ननवरे, २) सोमनाथ ननवरे, ३) इतर दोन अनोळखी इसम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्याचे मो.सायकलवरून घरी जात असताना नमुद ठिकाणी आले असता रोडचे कडेला ४ इसम फिर्यादीस हाक मारून बोलावून घेवून फिर्यादीचे गाडीवर असलेले शिवाई देवीचे फोटो पाहून म्हणाले की तु आमराईचा का आमराईत कुठे राहतो आणि दिपक राजगुरूला ओळखतो का असे विचारून फिर्यादीस तु दिपकचा भाऊ आहे का असे म्हणून नमुद आरोपीत मजकूर यांनी हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली त्यावेळी आरोपी क्र २ याने बाजूला पडलेले दगड घेवून फिर्यादीचे पाठीत फेकून मारले व जवळ येवून पुन्हा फिर्यादीचे डोक्यात विटा मारल्या आहेत तसेच सदर मारहाणीत फिर्यादीचा विवो कंपनीचा मोबाईल व रोख रक्कम व चांदीचे ब्रेसलेट हे कुठेतरी पडून गहाळ झाले आहे.म्हणून. तपासः- पोना/७३२/कामुर्ती- ८८०५०५१३०० |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ११४/२०२३ भादंविसक २८६,३३६,३४ सह जीवनाश्यवक का.वस्तु काक ३ व ७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०१/०३/२०२३ रोजी ९.४५ वा.ब्रम्हदेव नगर होटगी रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/०३/२०२३ रोजी १४.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सपोनि श्रीनाथ लक्ष्मण महाडीक,नेम- गुन्हे शाखा,सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सर्फराज ऊर्फ बब्बु शफी शेख,२) अमन अरिफ सय्यद, ३) अब्दुलकरीम साईबाबा शेख,सर्व रा- ४४२,स्वामी विवेकांनद नगर हत्तुरे वस्ती सोलापूर |
| **मिळाला माल** | | १,३३,९८०/- रू त्यात लाल पिवळया रंगाचे भारत कंपनीची गॅस टाकी,विदयुत मोटार,एक इलेक्ट्रीक वजन काटा,एक रिक्षा व एक विवो कंपनीचा मोबाईल,रोख रक्कम. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपी क्र १ व २ यांनी ब्रम्हदेव नगर हॉटेल बालाजी सरोवरच्या समोरील बोळात होटगी रोड सोलापूर येथे एका पत्र्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | | खोलीत भारत गॅस कंपनीचे घरगुती वापराचे एकूण ०७ एल पी जी सिलेंडर अवैधरित्या जवळ बाळगून त्यापैकी एका घरगुती वापराचे एलपीजी सिलेंडर मधील एलपीजी गॅस हा हयगयीने व धोकादायक तसेच असुरक्षीत पणे स्वत:चे आणि इतर लोकांच्या जीवातास धोका निर्माण होईल हे माहित असताना ही रिक्षा चालक नामे यातील आरोपी क्र ३ याचे ताब्यातील रिक्षा क्र एमएच १३ बीव्ही १२१० यास इलेक्ट्रीक मोटारच्या सहाय्याने संगणमत करून भरताना मिळून आला आहे.म्हणून. तपास:- पोसई शेख- **९६८९७०७८६४** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ११५/२०२३ भादंविसक ४२० सह आयटीॲक्ट ६६ (ड) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २६/०१/२०२३ रोजी १६.०० वा चे सुमारास फिर्यादीचे खाते मधून |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/०३/२०२३ रोजी २२.५६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | योगेश आदिनाथ सगरे,वय-३५ वर्षे,रा- २२२,स्वामी विवेकांनद नगर हत्तुरे वस्ती विमानतळ जवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | ॲक्सीस बॅक खाते क्र ९२२०२००६७०४६०६८ चा धारक नामे कृष्णकुमार पुर्ण नाव पत्ता माहित नाही. |
| **फसवणुक रक्कम** | | २,३२,५००/- रूपये. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे घरी असताना त्याचे मोबाईल मधील टेलीग्राम ॲपमध्ये https://globalcrypto१.com ही लिंक आली होती तसेच त्या लिंकखाली या लिंकमधील व्हिडीओला लाईक व सबस्क्राईब केल्यास आमचेकडून १५०/- रू आपल्याला ट्रान्झेक्शन होतील असे लिहलेले होते त्यानुसार फिर्यादीने सदर व्हिडीओ लाईक व सबस्क्राईब केले काही वेळाने फिर्यादीचे ॲक्सीस बॅक खात्यामध्ये १५०/- रू दोन वेळा जमा झाले त्यानंतर त्यांनी फिर्यादीस मेसेज पाठविला त्यामध्ये १०००/- रू चे ट्रान्झेक्शन केल्यास १३९०/- रू व ३०००/- रू चे ट्रन्झेक्शन केल्यास ३,९००/- रू आपल्या खात्यात जमा होईल अशा प्रकारचा मेसेज आला होता तेव्हा फिर्यादीने त्याचे एचडीएफसी बॅक ॲकाऊंड मधून फोन पे व्दारे मो क्र ९९१०६८२५५४ या क्रमांकावर १०००/- रू पाठविले परंतु १३९०/- रू मिळाले नाही तसेच दि ०४/०२/२०२३ रोजी फिर्यादीचे टेलीग्राम ॲपमध्ये त्यानी पुन्हा नवीन युपीआयआयडी पाठवून त्यावर १०००/- रू पाठविले काही वेळाने फिर्यादीचे ॲक्सीस बॅकेचे अंकांऊड मध्ये १३९०/- रू व ६५०/- रू असे एकूण २०४०/- रू जमा झाले त्यामुळे आरोपीवर फिर्यादीचा विश्वास बसल्याने फिर्यादीने एचडीएफसी बॅक अंकाऊट मधून पुन्हा ५०००/- रू पाठविले काहि वेळाने एकूण ७६५०/- रू जमा झाले त्यामुळे फिर्यादीने एचडीएफसी बॅक खातेमधून ७०००/-, २५९००/-,५००००/- रू व पेटीएम व्दारे २५०००/- रू व ॲक्सीस खातेमधून ५००००/- रू आरोपीस त्याचे नमुद खातेक्रमांकावर पाठविले होते परंतु त्याबदल्यात फिर्यादीस कोणतीही रक्कम परत मिळाली नाही त्यामुळे फिर्यादीने मेसेजव्दारे पैसे का पाठविले नाही त्याबाबत विचारणा केली त्यांनी तुमची रक्कम २५००००/- रू होण्यासाठी ६९०००/- रू कमी आहेत ते पाठवा आम्ही तुम्हाला ४०००००/-रू पाठवितो असे सांगितल्यावर फिर्यादीने त्यानुसार पुन्हा ६९०००/- रू नमुद आरोपीचे ॲक्सीस बॅक खाते क्रमाकावर रक्कम पाठविले होती तरी देखील फिर्यादीस कोणतीही रक्कम परत मिळाली नाही त्यामुळे फिर्यादीने त्यास रक्कम परत का पाठविली नाही असे मेसेजव्दारे विचारले असता आरोपीने परत २५००००/- रू पाठवा तुम्हाला ८०००००/-रू पाठवितो असे सांगितले वर फिर्यादीची खात्री झाली की सदर आरोपी हा फिर्यादीची आर्थिक फसवणुक करत आहे.म्हणून. तपास:- पोनि जगताप- **८३२९२९५०५१** |